
वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-बुधवार दि. १४ मे २०२५ पाने ४ किंमत ३

# केंद्रीय हज कमिटी मध्ये हज यात्रेत २६० कोटी रुपयांचा घोटाळा

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com
दिव्य वार्ता

## हज यात्रेकरूंमध्ये प्रचंड असंतोष, यात्रेकरूनची फसवणूक करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांची सीबीआयमार्फत चौकशी करावी



## ५२ हजार यात्रेकरूना यंदा हज यात्रेला मुकावे लागले-जे.डी.शाह

## मुंबई हज कमिटीच्या अधिकाऱ्यांनी साऊदी अरेबिया सरकारकडे यात्रेकरूकडून जमा केलेली रक्कम मुदतीत न पाठविल्यामुळे झाला पेच निर्माण

बीड, (दिव्य न्युज):- केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालयाच्या भारतीय हज कमिटी ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र हज कमिटी मुंबई मधील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने २६० कोठी रुपयांचा घोटाळा झाल्यामुळे यंदा महाराष्ट्रासह भारतातील सुमारे ५२ हजार यात्रेकरू हज करण्यापासून वंचित राहणार आहेत. यामुळे हज यात्रेकरूंमध्ये सर्वत्र प्रचंड असंतोष पसरला आहे. या गंभीर प्रकरणाची दखल राष्ट्रपती द्रोपती मुर्मु व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेऊन पवित्र हज सारख्या यात्रेकरूंची फसवणूक करणाऱ्या हज कमिटीतील बेजबाबदार अधिकाऱ्यांची सीबीआय मार्फत चौकशी करून कडक कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठविलेल्या पत्रात पुढे म्हटले आहे की भारतातील ८०० टूर्स कंपन्यांकडून यंदा सुमारे ५२ हजार नागरिकांना हज यात्रेसाठी पाठवण्यात येणार होते. मात्र मुंबई हज कमिटीच्या अधिकाऱ्यांनी सौदी अरेबिया सरकारकडे हज यात्रेकरूंकडून जमा केलेली रक्कम मुदतीत न पाठविल्यामुळे हा पेच निर्माण झाला



आहे. संपूर्ण देशातील मुस्लिम समाजात या अधिकाऱ्यांच्या विरोधात आता प्रचंड असंतोष आणि नाराजी पसरली आहे. कारण भारतातील या ८०० टूर्स कंपन्यांनी या ५२ हजार यात्रेकडून सुमारे २६० कोटी केंद्रीत हज कमिटी व महाराष्ट्र हज कमिटीकडे रुपये मुदतीत रितसर जमा केलेले होते. मात्र दोन्ही हज कमिटी कडून भारतातून सुमारे १ लाख २५ हजार हज यात्रे करूंना यंदा हजला नेण्यात येणार होते. या व्यतिरिक्त खाजगी टूर्स कंपन्यांकडून या ५२ हजार लोकांना हजला नेण्यात येणार होते. परंतु मुंबई हज कमिटी चे बेजबाबदार अधिकारी आणि टूर्स कंपन्यांच्या मालकांनी या ५२ हजार यात्रेकरूंना गेल्या काही महिन्यांपासून अंधारात ठेवले. टूर्स कंपन्यांनी जमा केलेली कोट्यवधीची रक्कम सौदी अरेबिया सरकारकडे तात्काळ जमा करा अशा सुचना वारावार सौदी सरकारने भारत सरकारला देऊनही टूर्स चालक तसेच हज कमिटी च्या अधिकाऱ्यांनी हे पैसे मुदतीत न पाठविले नसल्यामुळे १८ जानेवारी ▶▶ पान २ वर

## उच्च न्यायालयाची केलेली फसवणुक वकिलाच्या अंगलट

### अद्याप आरोपी मोकाट फिरत आहे

बीड, (दिव्य न्युज):- बोगस जमीन अधिग्रहणाचे सव्वा दोन कोटी रुपये मिळण्यासाठी बनावट, बोगस निवाडा व ईस्टेटमेंट तयार करुन मा.न्यायालयाची फसवणुक करणे वकिल चाळक यांचे चांगलेच अंगलट आले आहे. शिवाजी नगर पो.स्टे येथील गुन्हा क्र.६१५/२०२३ या गुन्ह्यातील मुख्य आरोपी ड.रामेश्वर चाळक याने त्याचे नातेवाईक व इतरांना विश्वासात घेवुन बृ.ल.पा. उजवा कालवा मौजे आर्वी भाग क्र.४ ता.शिरुर का. जि.बीड या प्रकल्पाचा खोटा अवॉर्ड तयार करुन रक्कम रु २,०३,३४,६६५/- रु एवढा निधी शासनाकडुन मंजुर करुन घेतला, परंतु आर.टी.जी.एस न केल्यामुळे मुख्य आरोपीने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र.४०३२/२०२१ दाखल केली. मा.उच्च न्यायालय औरंगाबाद यांचे दि.३०.०६.२०२३ रोजीचे निर्देशाचे अनुषंगाने प्रकरणात चुकीचा भुसंपादन निवाडा, बोगस राजपत्र प्रसिध्द करुन व विविध कार्यालयाशी करण्यात आलेले बोगस व खोटे पत्र व्यवहार व त्या आधारे करण्यात आलेले चुकीची निधी मागणी यामध्ये सकृत दर्शनी रिट याचिका क्र.४०३२/२१ मधील आरोपीचे नातेवाईक नामदेव कुंडलीक भोकरे, राम रंगन्नाथ नन्नवरे व वकिल रामेश्वर चाळक या सर्वांनी स्वत:चे आर्थीक कायद्यासाठी चुकीचे कागदपत्रे खोटे व बनावट दस्तऐवज तयार करुन ते खरे असल्याचे भासवुन महाराष्ट्र शासन तसेच मा.उच्च न्यायालयाची दिशाभुल व फसवणुक केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचे विरुध्द भा.दं.वि. कलम ४२०, ४६३, ४६४, ४६८, ४७१, ३४ नुसार गुन्हा नोंद झाला आहे. सदरील गुन्ह्यास एक वर्षापेक्षा जास्त काळ लोटलेला असुन देखील मुख्य आरोपीस पोलीस प्रशासन धरत नाही. मुख्य आरोपी मोकाट रस्त्याने तसेच हॉटेल मध्ये पार्टी करत असल्याचे दिसत आहे. पोलीसांचा आरोपीस धाक असल्याचे दिसत नाही किंवा पोलीसांची आरोपीने मनधरणी केली असल्याचे दिसत आहे. या गुन्ह्यातील मुख्य आरोपी रामेश्वर चाळक हा पकडल्यास आणखी इतर आरोपींचा या गुन्ह्यामध्ये सहभाग असल्याची शक्यता आहे.वकिल चाळक याने निरक्षर असलेल्या शेतकऱ्याच्या कोऱ्या कागदावर सहया घेतल्या आहेत तर काहींचे फक्त हाताने नांवे टाकुन ▶▶ पान २ वर

## कर्नल सोफिया कुरेशींच्या घरावर हल्ला?

### भाजप मंत्र्याकडून आक्षेपार्ह विधान; वारिस पठाण संतापले


### भाजप मंत्र्यावर चार तासात गुन्हा दाखल करा: उच्च न्यायालय

कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल वादग्रस्त करणारे भाजप मंत्री विजय शाह अडचणीत सापडले आहेत. मध्य प्रदेश उच्च न्यायालयानं विजय शाह यांच्या वक्तव्याबाबत कठोरभूमिकाघेतली आहे. विजय शाह यांच्यावर पुढील चार तासात एफआयआर करण्यात यावी असे निर्देश मध्यप्रदेशच्या डीजीपींना दिले आहेत. हायकोर्टानं या वक्तव्याबाबत स्वत:दखल घेत म्हटलं की या प्रकरणी एफआयआर दाखल झाली आहे. या प्रकरणी उद्या पुन्हा सुनावणी होणार आहे.

मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अतुल श्रीधरन यांच्या खंडपीठानं विजय शाह यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल झाला पाहिजे असं म्हटलं. आता उद्या सकाळी पुन्हा या प्रकरणी सुनावणी होईल. भाजप मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरेशींबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं होतं.त्यांनी आपल्या मुलींचे कुंकू पुसले होते, त्या लोकांना आम्ही पान २ वर

मुंबई , (दिव्य न्युज):- पहलगामवरील हल्ला आणि त्यानंतर ऑपरेशन सिंदूरमुळे भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला. हा तणाव फक्त सीमेवरच नाही तर सायबर हल्ल्यातूनही दिसून येत आहे. अपप्रचार करून गोंधळ निर्माण करण्यासाठी सोशल मीडियावर अफवा पसरविण्याचे प्रयत्न होत असल्याचे प्रकरण समोर आले आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर प्रकाशझोतात आलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर देशभरातून कौतुकाचा वर्षाव झाला. त्यांच्या देशभक्तीबद्दल सर्वांनाच अप्रूप वाटले. मात्र सोफिया कुरेशींच्या बेळगावमधील घरावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित ▶▶ पान २ वर






### भाजपचे विजय शहांच्या घरासमोर काँग्रेसचे निदर्शने

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि मध्य प्रदेशचे मंत्री विजय शहा यांनी ऑपरेशन सिंदूरची माहिती देणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविरुद्ध आक्षेपार्ह विधान केल्यानंतर गदारोळ झाला आहे. काँग्रेसकडून त्यांना बडतर्फ करण्याची मागणी होत आहे आणि आता त्यांच्या विरोधात घोषणाबाजी ▶▶ पान २ वर









बीड : बीड आगारात एस.टी. महामंडळाच्या नवीन १० बसेसचे लोकार्पण, बुधवारी (दि.१४) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले.

## मर्जी लाइनमनची; शहरात कुठे १ तर कुठे ५ तास पाणी

### नियोजनाचा अभाव, पाणी पुरवठ्याचे बिघडल्याने टंचाई

बीड , (दिव्य न्युज):- शहरातील लाखो नागरिकांची तहान भागविण्यासाठी नगर परिषदेने लाइनमन नियुक्त केले आहेत. कोणत्या भागात किती वेळ पाणी द्यायचे, हे लाइनमनच्या मनावर आहे. मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध असूनही केवळ नियोजनाचा अभाव असल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा सामना सहन करावा लागतोय. एका वॉर्डातील कुठे एक तास तर कुठे पाच तास पाणीपुरवठा केला जात ▶▶ पान २ वर



### शहरात आठ दिवसांआड पाणीपुरवठा

दोन्ही धरणांत मुबलक पाणीसाठा असूनही नियोजनाच्या अभावामुळे नगर परिषदेकडून शहराचा पाणीपुरवठा पंधरा ते वीस दिवसांआड केला आहे. आता व्यवस्थित नियोजन करून शहराला आठ दिवसांआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन आहे.

### कुठे एक तास, तर कुठे दोन तास पाणी!

इस्लामपूर, सिटी सप्लाय, खाजबाग, पेठ बीड भागात काही ठिकाणी लाइनमन दीड ते दोन तास पाणी सोडत असल्याची ओरड आहे. शहरातील प्रत्येक ठिकाणी पाणी सोडण्याची वेळ एक तासच असावी, अशीही मागणी पुढे येत आहे

### शहराच्या पाणीपुरवठ्यावर नियंत्रण कोणाचे ?

शहराला पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाकडे आहे. नगर परिषदेने व्हॉल्व्हमन शहरातील विविध भागांत जलकुंभांमध्ये पाणी चढवतात. तेथून हा पाणीपुरवठा शहरातील वेगवेगळ्या भागाला करण्यात येतो. नगर परिषदेने निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे शहरातील हद्दवाढ भागात टँकरने पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

# मुलीला गाईच्या गोठ्यात बांधले

## केळी, टरबुजाच्या साली खायला दिल्या ;संभाजीनगरच्या दामिनी पथकाकडून मुलीची सुटका

गेवराई , (दिव्य न्युज):- जन्मत: गतीमंद असलेल्या पाच वर्षीय मुलीच्या आईचे निधन झाल्यानंतर बापाने दुसरे लग्न केले. गतीमंद असलेल्या मुलीकडे आई-वडिल दुर्लक्ष करत तिचा छळ करू लागले. शेवटी दारुड्या बापाने गेल्या काही दिवसांपासून त्या निष्पाप गतीमंद मुलीला जनावराच्या गोठ्यात बांधले. तिला केळी व टरबुजाच्या साली खायला देत राहिले. जेव्हा ही माहिती एका महिलेला कळली तेव्हा त्या महिलेने संभाजीनगर येथील हज हाऊस जवळील खलील अहमद यांच्या आश्रमात या मुलीला सोडण्यात आले. मुलीची प्रकृती आणि अवस्था बिकट असल्याने खलील अहमद यांनी तिच्यावर उपचार केले. सदरचे आश्रम हे मुलांचे असल्यामुळे या घटनेची माहिती संभाजीनगरच्या दामिनी पथकाला झाली. तेव्हा दामिनी पथकाने आश्रमात जाऊन मुलीला ताब्यात घेत तिचे पुनर्वसन केले. सदरचा प्रकार हा गेवराई शहरातला आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर सर्वत्र संताप आणि मुलीबाबत हळहळ व्यक्त केली जात आहे.

याबाबत अधिक असे की, गेवराई शहरामध्ये सुफिया (काल्पनिक नाव) ही पाच वर्षाची मुलगी जन्मत: अपंग होती. काही दिवसांपूर्वी तिच्या आईचे निधन झाले. वडील व्यसनी, त्यात त्याने दुसरे लग्न केले. वडिलांसाठी सुफिया ही डोईजड झाल्याने सुफिया हिस गाईच्या गोठ्यामध्ये तिच्या पायाला बांधून ठेवण्यात आले. दरम्यान पैठण येथील एक महिला ही माहेरी आलेली होती. तेव्हा तिला लहान मुलीच्या रडण्याचा आवाज आला. हा आवाज कुणाचा आहे? ती मुलगी का रडतेय? याची माहिती संबंधित महिलेने घेतली तेव्हा धक्कादायक प्रकार तिला माहित झाला. सुफियाची अवस्था बघवत नसल्याने आणि बापाला जाब विचारल्यानंतरही तो व्यवस्थीत उत्तर देत नसल्याने पैठणहून आलेल्या त्या महिलेला सुफियाबाबत मायेचा पाझर फुटला. तिने संभाजीनगरच्या हज हाऊस जवळील खलील अहमद यांच्या आश्रमात त्या मुलीला सोडले. तिथे तिच्यावर योग्य उपचार झाले. परंतु आश्रमात केवळ मुलेच असल्याने त्या मुलीची माहिती संभाजीनगरच्या दामिनी पथकाला देण्यात आली. तेव्हा काल दामिनी पथक आश्रमात डेरेदाखल झाले. पथकातील उपनिरीक्षक कांचन मिरधे, अंमलदार निर्मला निंभोरे, लता जाधव, सरिता कुंडारे, अंबिका दारुमटे, प्रियंका भिऊसेन, मनीषा बनसोडे, पुजा जाधव या सर्वांनी कायदेशीर बाबी तपासून सुफियाचे पुनर्वसन केले. सदरचा प्रकार हा गेवराई शहरात घडल्याने एकच खळबळ उडाली आहे.





## बीड बायपासच्या लक्ष्मी चौकात रात्रीतून संभाजी महाराजांचा पुतळा

### जिल्ह्यात महाराजांची जयंती उत्साहात

बीड, (दिव्य न्युज):- स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या अनुषंगाने मध्यरात्री बीड शहरालगतच्या बायपास रोडवरील लक्ष्मी चौकात शंभू भक्तांनी छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा उभारला. सदरचा पुतळा हा संबंधित तरूणांनी स्वखर्चातून उभारल्याचे सांगण्यात येते. मात्र सदरचा पुतळा उभारण्यात आल्यानंतर पाच ते सहा शंभू भक्तांना बीड ग्रामीण पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. विना परवाना जयंतीनिमित्त छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर व्यासपिठ उभारल्या प्रकरणी तीन ते चार तरूणांना बीड शहर पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कळते. जिल्हाभरात छत्रपती संभाजी महाराजांची जयंती उत्साहात साजरी होत आहे.



स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी अनेक सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल दिसून येत असून बीड शहरासह जिल्हाभरातल्या ग्रामीण भागात छत्रपती संभाजी महाराजांचा जयघोष होत आहे. अनेक ठिकाणी रॅली काढण्यात आल्या तर संध्याकाही महाराजांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक अनेक ठिकाणी आयोजित केली आहे. जयंतीनिमित्त बीडमध्ये मात्र एक वेगळी बातमी समोर आली आहे. बीड शहरालगतच्या बायपासवरील लक्ष्मी चौकात काही शंभू भक्तांनी मिळून स्वखर्चातून छत्रपती संभाजी महाराज यांचा उभा रेखीव पुतळा रात्रीतून बसवला. फटाक्याची आतिषबाजी आणि छत्रपती संभाजी महाराजांचा जयघोष करत तरूणांनी महाराजांचा पुतळा त्या ठिकाणी उभारला आहे. सदरची माहिती ग्रामीण पोलिसांना झाल्यानंतर पाच ते सहा तरूणांना पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येते. दुसरीकडे छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर कार्यक्रमानिमित्त व्यासपिठ उभारण्यात आले. विना परवाना व्यासपिठ उभारले गेल्याने तिथेही तीन ते चार तरूणांना बीड शहर पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येते.

## महाविकास आघाडीत राजकारण फिरले

### उद्धव ठाकरेंचा आमदार शरद पवारांच्या गाडीत

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्याच्या राजकारणात येत्या काही दिवसात भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारणात घटना घडामोडी वेगाने घडत आहेत. त्यामुळे वातावरण चांगलेच तापले आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीला मोठे यश मिळाले. त्यामुळे गेल्या पाच महिन्यात महाविकास आघाडीतील अनेक नेतेमंडळींनी महायुतीमध्ये प्रवेश कला आहे. त्यामुळे महायुतीमधील इनकमिंग वाढले आहे. त्यातच आता गेल्या काही दिवसापासून राज व उद्धव ठाकरे हे बंधू एकत्र येणार असल्याची चर्चा रंगली होती. तर दुसरीकडे ठाकरे कुटुंबानंतर आता पवार कुटुंब देखील एकत्र येण्याची चर्चा रंगली आहे. त्यामुळे कोण एकत्र येणार ? याची चर्चा शिगेला पोहचली असतानाच ठाकरे गटाचे आमदार शरद पवारांच्या गाडीत दिसल्याने भुवया उंचावल्या आहेत.

गेल्या काही दिवसापासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस (छउझ) एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्यातच आता महाविकास आघाडीच्या अनेक नेत्यांनी शरद पवार यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. त्यामुळे सध्या नेमके काय सुरु आहे याची चर्चा शिगेला पोहचली आहे. बुधवारी सकाळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सचिन अहिर शरद पवार यांच्या गाडीत बसून सिल्वर ओकच्या दिशेने गेले आहेत. यावेळी अहिर यांनी सिल्वर ओकवर जाऊन पवार यांच्याशी चर्चा केली.

## आष्टीच्या कऱ्हेवडगांव मध्ये शॉटसर्किटमुळे घराला भिषण आग

आष्टी (दिव्य न्युज):-तालुक्यातील क-हेवडगांव येथील श्रीधर खांडवे यांच्या घराला शॅार्ट सर्किटमुळे आग लागून गृहपयोगी वस्तू जळून खाक झाल्याची घटना मंगळवारी दि. १३ मे रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. घराला शॅार्ट सर्किटमुळे अचानक आग लागली. आगीचा भडका उडाल्याने घरातील असलेल्या फ्रीज व इलेक्ट्रॅानिक वस्तू चा स्फोट झाला दरम्यान घरात कोणाही उपास्थित नसल्याने कोणत्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. स्थानिक नागरिकांच्या मदतीने आग आटोक्यात आणली. या घटनेत घरातील सर्व संसारउपयोगी वस्तू जळून नष्ट झाल्या आहेत.आगीच्या घटनेमुळे मजूरी करून आपले जीवन जगणार्या खांडवे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. या घटनेमुळे पीडित कुटुंबाचे घर पुन्हा उभे करण्याचे मोठे प्रश्न उपस्थित झाले आहे.प्रशासनाने तात्काळ पंचनामा करून तातडीने मदत करावी अशी मागणी केली जात आहे.

तालुक्यातील क-हेवडगांव येथील मोलमजुरी करून उपजीविका भागवणारे श्रीधर खांडवे यांचे कुटुंब असून काल दि.१३ मे रोजी सायंकाळी अचानक विजेच्या शॉटसर्किटमुळे आगीचा भडका होऊन मोठा स्फोट झाला यामध्ये स्फोट ऐवढा मोठा होता की आगीचे लोळ ची लोळ बाहेर पडत होते.यावेळी त्यांच्या घरात कोणीच नव्हते. म्हणून सुदैवाने जिवीतहानी टळली आहे. मिळेल त्या साधनाने आग विझविण्याचा प्रयत्न केला.दरम्यान, या आगीवर नियंत्रण मिळेपर्यंत घरातील फ्रिज, अन्नधान्य व जीवन उपयोगी वस्तू, कागदपत्रे जळून खाक झाल्या.रोकड ही ६० ते ७० हजार जळून खाक झाली व २ लाखापेक्षा अधिक नुकसान झाल्याचे पिडीत खांडवे कुटुंबीयांनी सांगितले पीडित कुटुंबाला तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी मा.सरपंच जालिंदर नेते गायकवाड यांनी केली आहे.

पान १ वरून

### केंद्रीय हज कमिटी

ते १८ मार्च यादरम्यान हज यात्रेकरुंकडून हे पैसे जमा करण्यात करून देखिल ते पैसे सौदी सरकारला वर्ग करण्यात आले नाहीत. त्यामुळे मक्का आणि मदिना येथे या हजयात्रे करूंची संपूर्ण व्यवस्था करण्यासाठी एका हज यात्रे करुकडून ५० हजार रुपये टूर्स कंपनी आणि हज कमिटी अधिकारी यांनी जमा केले होते. सौदी सरकारने यासंदर्भात हज कमिटी आणि टूर्स कंपन्यांना वेळोवेळी आदेश देऊनही त्यांनी हे पैसे सौदी सरकारला वेळेवर न पाठ विल्याने त्याचा परिणाम म्हणून या ५२ हजार यात्रेकरूंना हज करण्यापासून आता मुकावं लागणार आहे. हि बाब पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निदर्शनास निवेदनाद्वारे आणून दिले आहे .

निवेदनात पुढे म्हटले आहे की केंद्रीय हज कमिटी व महाराष्ट्र हज कमिटी मधील सी. पी. बक्षी, सुरेंद्र श्रीवास्तव, बी. गोमासे आणि युसुफ खरडा या चार अधिकाऱ्यांवर या संदर्भात अनेक गंभीर आरोप आहेत. युसुफ खरडा यांच्या अलखालील, अलायन्स अल इम्रान या कंपन्यांनी भारतात ५२ हजार लोकांकडून प्रत्येकी २ हजार रुपये जमा करण्यासाठी २६ जणांची टीम बनवली. या सर्वांनी प्रत्येकी दोन हजार रुपये जमा केल्याची कुठलीही माहिती कागदावर नसल्याने मोठा पेच निर्माण झाला आहे. मुंबई येथे हज हाऊसचे कामकाज आजही चालू असून या संदर्भातील काही नागरिकांच्या तक्रारीचे अद्यापही निराकरण करण्यात आले नाही. हज हाऊसचे अधिकारी या संदर्भात काहीही बोलायला तयार नाहीत. मुंबई हज हाउस ला पोलिसांच्या छावणीचे स्वरूप प्राप्त झाले असून या हज हाउस मध्ये कोणत्याही नागरिकाला तसेच सदस्यानाही प्रवेश दिला जात नाही. यामुळे हज यात्रे करूंवर मोठा अन्याय असून भारत सरकारने या संदर्भात तातडीने उपाययोजना करुन ५२ हजार यात्रेकरूंना हजला पाठवण्याची व्यवस्था करावी अशी मागणी देशातील मुस्लिम बांधवांकडुन करण्यात येत आहे. निवेदनात शेवटी म्हटले की मुंबई हज हाऊस मधील अधिकारी हे अप्रशिक्षित असून या हज संदर्भातील कोणत्याही ज्ञानाची त्यांच्याकडे माहिती नाही. हज कसे करावे या संदर्भात ते काहीही माहिती देऊ शकत नाही. या संदर्भातील त्यांनी कोणतेही प्रशिक्षण घेतले.नाही, असे असतानाही त्यांना त्या ठिकाणी नेमण्यात आले, ही हज यात्रेकरूंची घोर फसवणूक झाली आहे. या सर्व प्रकरणात सुमारे २६० कोटी रुपयांचा मोठा घोटाळा असून यात वाढही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.कारण मुंबई हज कमिटीतील अधिकाऱ्यांच्या वर्तणुकीबद्दल हज यात्रेकडु मात्र निशब्द झाल्या सारखे झालेले आहे.

तसेच मुंबई हज हाऊस मध्ये यात्रेसाठी साधा टेन्ट ही लावण्यात आलेला नाही. इतर कोणत्याही सुविधा तेथे उपलब्ध नाहीत. हज यात्रे करूंच्या जीवाशी आणि भावनेशी हे अधिकारी खेळत आहेत. हज हाऊस मध्ये जाणाऱ्या कोणत्याही नागरिकाला कार्यकारी अधिकारी भेटणार नसल्याचे सांगितले जाते. हज कमिटीचे मालक कोण आहेत असाही सवाल यात्रेकरु यांनी केला आहे. हज यात्रेसाठी केलेल्या पत्र व्यवहारा संदर्भात हज कमिटीचे जागृत सदस्य इमरान शेख यांना कोणतेही उत्तर अद्यापही देण्यात आलेले नाही अशी अवस्था जर कमिटीच्या सदस्यांची असेल तर सर्वसामान्य नागरिकांची काय व्यथा असेल असा सवालही उपस्थित केला जात आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून या हज यात्रेकरूंची हज करण्याची इच्छा होती मात्र अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे व हलगर्जीपणामुळे त्यांचे स्वप्न हे आता स्वप्नच राहिले आहे. कारण अधिकाऱ्यांनी पैसे घेऊनही ते हजला पाठवू शकत नाही त्यात केंद्री सरकार आणि महाराष्ट्र सरकार जबाबदार आहे. कारण महाराष्ट्राच्या हज कमिटी च्या काही सन्माननीय सदस्यांनी या सर्व बाबी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कानावर घालण्यात आल्या आहेत. या २६० कोठी रुपयांचा घोटाळा झाल्यामुळे हज हाऊस मधील अधिकाऱ्यांच्या कॅनडा, ऑस्ट्रेलिया येथील अवैधेसंपदेची सीबीआय मार्फत चौकशी करावी, यातून सत्य ते सगळे बाहेरील येईल अशी मागणी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते जे.डी.शाह यांनी केली आहे .

### भाजप मंत्र्यावर चार

त्यांच्याच बहिणीला पाठवून चांगलाच धडा शिकवला. त्यांनी आमच्या हिंदूंना कपडे काढून मारले, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्याच समाजातील बहिणीला पाठवले की, जेणेकरुन ज्यांनी आमच्या बहिणी विधवा केल्या, त्यांना त्यांच्या समाजातील बहीण नग्न करुन सोडेल, असं विजय शाह म्हणाले होते.

भाजप मंत्री विजय शाह यांच्या वादग्रस्त वक्तव्याचे पडसाद उमटत आहेत. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष जितू पटवारी यांच्यासह काँग्रेसचं शिष्टमंडळ श्यामला हिल्स पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाल होतं. काँग्रेसनं विजय शाह यांच्यावर देशद्रोहाचा खटला दाखल करण्याची मागणी केली. मध्य प्रदेश काँग्रेस उद्या या प्रकरणी राज्यभरात पोलीस ठाण्यांमध्ये तक्रार देणार आहे.

काँग्रेस अध्यक्ष जितू पटवारी म्हणाले, भाजपच्या विजय शाह यांनी सैन्याचा अपमान केला आहे. त्यांना एक मिनिट देखील मंत्रिपदावर राहण्याचा अधिकार नाही. विजय शाह यांच्या वक्तव्यामुळं देशातील लोकांमध्ये नाराजी आहे. श्यामला हिल्स पोलीस ठाण्यामध्ये यासंदर्भातील निवेदन दिलं आहे. काँग्रेसनं पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री मोहन यादव यांना पत्र लिहिलं आहे.

### उच्च न्यायालयाची

वकिलपत्र मा.न्यायालयात दाखल केले होते.यापुर्वी देखील ङ चाळक याने बीड जिल्ह्यातील शिरुर कासार तालुक्यातील शिरापुर धुमाळ येथील उथळा प्रकल्पात कालव्यासाठी संपादीत केलेल्या जमीनीचा वाढीव मावेजा मिळण्साठी क्षेत्र वाढवुन बनावट कागदपत्रे तयार करुन कोर्टात दाखल केले होते त्याचा देखील गुन्हा शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल आहे.या बनावट कृत्यामधुन धनदांडगी संपत्ती कमविलेली असुन सदरील संपत्ती नातेवाईकांच्या नांवे असल्याचे देखील समजलेले आहे.

### कर्नल सोफिया

असलेल्यांनी हल्ला केल्याची अफवा सोशल मीडियावर उठविण्यात आली. कर्नाटक पोलिसांनी याची दखल घेऊन सदर पोस्ट डिलीट केली आहे.

एक्सवर अनीस उद्दीन या अकाऊंटवरून सदर खोटी पोस्ट शेअर करण्यात आली होती. कर्नल सोफिया कुरेशी आणि त्यांच्या मुलावर हल्ला झाला असून घराला आग लावण्यात आल्याचा उल्लेख या पोस्टमध्ये करण्यात आला होता. सोफिया कुरेशी यांच्या घराबाहेर मुस्लीम समाजाविरोधात द्वेषपूर्ण घोषणा दिल्या गेल्या, असाही दावा पोस्टमध्ये करण्यात आला होता.

सदर अकाऊंटचे लोकेशन कॅनडामधील ब्रिटिश कोलम्बिया येथील दाखवले गेले. या अकाऊंटवरून ४०५ जणांना फॉलो करण्यात आले होते. तर त्याचे ३१ फॉलोअर्स होते. विशेष म्हणजे हे अकाऊंट व्हेरिफाईड ब्लू टीक असलेले अकाऊंट होते. तसेच पाकिस्तानचे पहिले पंतप्रधान मोहम्मद अली जीना, लष्करप्रमूख असीम मुनीर आणि इतर लष्करी अधिकाऱ्यांचा फोटो अकाऊंटला जोडण्यात आलेला होता.

एक्सवरील गछ-ीररळप या आणखी एका अकाऊंटवरून अशाच प्रकारची पोस्ट टाकण्यात आली होती. या पोस्टमध्ये लिहिले गेले, ठडड ने पुन्हा एकदा द्वेष पसरविला. भारतीय लष्कराच्या अधिकारी आणि प्रवक्त्या कर्नल सोफिया कुरेशी यांना लक्ष्य करण्यात आले आहे. बेळगावमधील त्यांच्या घरावर मध्यरात्री ३ वाजता हल्ला करण्यात आला. मुलगा समीर गंभीर जखमी झाला आहे. तर घर पेटवून देण्यात आले. कुरेशी यांचे कुटुंब सध्या दिल्लीत लष्कराच्या संरक्षणाखाली आहे.

कर्नाटक पोलिसांनी काय म्हटले?

बेळगावचे पोलीस अधीक्षक डॉ. भीमाशंकर गुलेद यांनी सदर पोस्ट व्हायरल झाल्यानंतर अशाप्रकारची घटनाच घडली नसल्याचे स्पष्ट केले. सदर पोस्ट खोटी असून केवळ गोंधळ निर्माण करण्यासाठी केली असल्याचे त्यांनी म्हटले. अतिरिक्त पोलीस अधीक्षक एसएन श्रुती यांनीही ही पोस्ट बोगस असल्याचे म्हटले. ही पोस्ट ज्या अकाऊंटवरून शेअर झाली, त्याचे वापरकर्ते परदेशातील आहेत. आम्ही त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहोत. कुरेशी यांच्या कुटुंबाला सुरक्षा पुरविण्यात आली असून आम्ही पुढील तपास करत आहोत.

ऑपरेशन सिंदूरनंतर कर्नल कुरेशी यांच्याशी संबंधित सायबर हल्ल्यांमध्ये वाढ झाली होती. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, महाराष्ट्र सायबर पोलिसांनी सात गटांची ओळख पटवली होती, ज्यांनी पहलगाम हल्ल्यानंतर भारतातील महत्त्वाच्या संकेतस्थळांना लक्ष्य करणारे १५ लाख सायबर हल्ले केले होते. यापैकी केवळ १५० हल्ले यशस्वी ठरल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

### भाजपचे विजय शहांच्या

सुरू आहे. काँग्रेसने त्यांच्या घराबाहेर निदर्शने केली आणि नेमप्लेटला काळे फासले तर एमआयएमचे नेते वारिस पठाण यांनीही संताप व्यक्त करत भाजपवर टीका केली आहे.

कुंवर विजय शहा यांच्या वादग्रस्त विधानाविरोधात काँग्रेस नेते मनोज शुक्ला त्यांच्या अनेक समर्थकांसह बंगल्यावर पोहोचले आणि त्यांच्या नामफलकाला काळे फासले. बंगल्याच्या बाहेर तिरंगाही फडकवण्यात आला. यावेळी त्यांनी त्यांच्या समर्थकांसह तेथे घोषणाबाजीही केली. एवढेच नाही तर घोषणाबाजीदरम्यान काँग्रेस नेत्यांनी त्यांचा राजीनामाही मागितला.

जीतू पटवारी यांचाही हल्लाबोल

शहा यांनी कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणीवर मध्य प्रदेश काँग्रेस अध्यक्ष जितू पटवारी यांनीही नाराजी व्यक्त केली. पटवारी म्हणाले, भारतीय सैन्याने अवघ्या २५ मिनिटांत पाकिस्तानमधील ९ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले. लष्कराने असेही म्हटले आहे की पाकिस्तानी सैन्यातील ४०-४५ हून अधिक लोक मारले गेले आणि अनेक दहशतवादीही मारले गेले, परंतु आज मंत्री विजय शाह यांनी त्या मुलींविरुद्ध अपमानास्पद पद्धतीने भाषण केले, ज्यामुळे पाकिस्तानी सैन्य हादरले. आता मुख्यमंत्री मोहन यादव यांना स्पष्ट करावे लागेल की राज्य सरकार किंवा संपूर्ण मंत्रिमंडळ या विधानाशी सहमत आहे का आणि जर तसे नसेल तर विजय शाह यांना आत्ताच बडतर्फ करावे.

१० वेळा माफी मागण्यास तयार

मात्र, जेव्हा विजय शाह यांचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आणि त्यांच्यावर कडक टीका होऊ लागली, तेव्हा त्यांनी स्पष्ट केले की कर्नल सोफिया त्यांच्या स्वतःच्या बहिणीपेक्षा जास्त आदरणीय आहेत. जर माझ्या कोणत्याही टिप्पणीमुळे कोणाचे मन दुखावले असेल तर मी १० वेळा माफी मागण्यास तयार आहे. हा व्हायरल व्हिडिओ सोमवारचा असल्याचे सांगितले जात आहे.

एका कार्यक्रमादरम्यान विजय शहा म्हणाले, ज्यांनी आमच्या मुलींचे सिंदूर नष्ट केले होते, आम्ही त्यांच्या बहिणीला त्या झालेल्या लोकांकडे पाठवले आणि त्यांना हिसका दाखवला ते म्हणाले, दहशतवाद्यांनी हिंदूंना नग्न करून मारले आणि मोदीजींनी त्यांच्या बहिणीला त्यांना मारण्यासाठी त्यांच्या घरी पाठवले. मंत्री पुढे म्हणाले की, मोदीजींनी त्यांच्या समुदायातील एका बहिणीला पाठवले आणि सांगितले की, तुम्ही आमच्या बहिणीला विधवा बनवले आहे, आता तुमच्या समुदायाची बहीण येऊन तुम्हाला हिसका दाखवेल.

### मर्जी लाइनमनची

आहे. यंदाचा उन्हाळा सुकर जाईल, अशी अपेक्षा नगर परिषदेकडून नागरिकांना होती. मात्र, ऐन उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाली. काही भागांत पंधरा, तर काही भागांत वीस दिवसांनंतर पाणी येते. पाणीटंचाईला शहरवासीय कंटाळले आहेत. शहराला दररोज ३५ एमएलडी पाण्याची गरज आहे. दररोज २८ एमएलडी पाणी येते. यात माजलगाव धरणातून ८ एमएलडी, बिंदुसरा २० एमएलडी दिवसात पाणी शहरात येते. वितरण व्यवस्थेत असलेल्या त्रुटी, संपूर्ण कारभार लाइनमनच्या हाती असल्याने शहराला टंचाईला तोंड द्यावे लागत आहे.

हा दुजाभाव का ?

नगर परिषद प्रशासनाने विविध उपाय केले असले तरी शहरातील तेलगाव नाका, हुसेना कॉलनी, खंडेश्वरी परिसर, धानोरा रोड या भागात पाणीपुरवठा अपुऱ्या प्रमाणात होत आहे